# जनसंपर्क अधिकारी

## मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय

रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे- ४०११०७

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

प्रेसनोट ३१९ - २३ दिनांक : - १८/०९/२०२३

**जबरी चोरी करणा-या सराईत गुन्हेगारास अटक, दोन गुन्हयाची उकल करुन ६३,०००. रु. किं. चा मुद्देमाल हस्तगत करण्यास गुन्हे प्रकटीकरण शाखेस यश.**

विरार पोलीस ठाणे कार्यक्षेत्रातील यातील तक्रारदार सौ.गिता जियालाल सोनी वय-४४ वर्षे, यांनी सांगितले की, गळयातील चैन अज्ञात चोरटयाने जबरीने चोरी करुन नेलेबाबत दिलेल्या तक्रारीवरुन विरार पोलीस ठाणे गुन्हा रजि. नं.८७७ /२०२३ भा.दं.वि.सं.कलम ३९२ प्रमाणे दि. १२/९/२०२३ रोजी गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

वरील गुन्हयाचे तपासाचे अनुषंगाने मा. वरिष्ठांनी दिलेल्या सुचनेनुसार विरार पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी तपास सुरु केला होता. नमुद गुन्हयाचे घटनास्थळावरील व आजुबाजुचे परिसरातील सी.सी.टि.व्ही. कॅमेराचे फुटेज पडताळणी केली असता, सदरचा गुन्हा हा विरार पोलीस ठाणे रेकॉर्डवरील आरोपीताने केला असल्याचे निष्पन्न झाले. नमुद गुन्हातील आरोपी नामे चिराग ललित जेटवा, वय २५ वर्षे, रा.गोपचरपाडा विरार पुर्व यास ताब्यात घेऊन गुन्हयाचे अनुषंगाने सखोल तपास केला असता, त्यांचा वर नमुद गुन्हात सहभाग निष्पन्न झाला असुन त्याचेकडे अधिक चौकशी कली असता त्याचेकडुन विरार पोलीस ठाणे अभिलेखवरील एकुण २ गुन्हे केल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.त्याचेकडुन जबरी चोरी केलेला एकुण ६३,००० रु किंमतीचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

- उघडकीस आलेले गुन्हे -

१) विरार पोलीस ठाणे गुन्हा रजि.नं ८७७/२०२३ भा.द.वि कलम ३९२ प्रमाणे.

२) विरार पोलीस ठाणे गुन्हा रजि.नं ८८६/२०२३ भा.द.वि कलम ३९२ प्रमाणे.

सदरची कामगीरी श्री. सुहास बावचे, पोलीस उप आयुक्त, श्री. रामचंद्र देशमुख, सहा.पोलीस आयुक्त, विरार विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली श्री.राजेंद्र कांबळे सो, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री.अभिजीत मडके, पोलीस निरीक्षक (गुन्हे) तसेच गुन्हे प्रकटीकरण शाखेचे आधिकारी सपोनि/ज्ञानेश फडतरे, पो.हवा/सचिन लोखंडे, संदीप जाधव, इंद्रनिल पाटील, विशाल लोहार, संदीप शेरमाळे, योगेश नागरे, पो.अं/संदीप शेळके, सचिन,बळीद, बालाजी गायकवाड, रोशन पुरकर, दत्तात्रय जाधव, प्रफुल सोनार यांनी यशस्वीरीत्या कामगीरी पार पाडली आहे.

----0000----